महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/ 6742

दि 5/०२/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
अमरावती विभाग अमरावती

**विषय** :- शासकीय रेखाकला (इंटरमिजीएट ड्रॉईग ग्रेड) परीक्षा -२०२५ उत्तीर्ण विदयार्थ्यांची Computer System Generated प्रमाणपत्र सवलतीच्या गुणांसाठी ग्राहय धरणेबाबत.

**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-७/४५३,दि.०२/०२/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला (इंटरमिजीएट ड्रॉईग ग्रेड) परीक्षा -२०२५ उत्तीर्ण विदयार्थ्यांची Computer System Generated प्रमाणपत्र सवलतीच्या गुणांसाठी ग्राहय धरणेबाबतचे पत्र सोबत जोडलेले आहे,सदर बाब आपल्या स्तरावर शिक्षक, विदयार्थी, पालक व सर्व संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणुन दयावी.

S. Salunke 05.02.2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा. सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र** :-

१) रा.म.पुणे यांचे पत्र

२) महाराष्ट्र राज्य,कला शिक्षण मंडळ,मुंबई यांचे क्रं कशिमं/२०२६/पाच/८८ दि.२३/०१/२०२६ रोजीचे पत्र.

**प्रतिलिपी** :-

१.मा.सचिव राज्य मंडळ, पुणे
२.मा. विभागीय उपसंचालक, अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस्तव.
३.शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
स.नं.८३२-ए, फा.प्लॉट नं.१७८, व
१७९ बालचित्रवाणीजवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं/परीक्षा-७/ ४५३
पुणे ४११ ००४
दि. ०२/०२/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय- शासकीय रेखाकला (इंटरमिजीएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा-२०२५ उत्तीर्ण विद्यार्थ्यांची Computer System Generated प्रमाणपत्र सवलतीच्या गुणांसाठी ग्राहय धरणेबाबत.**

**संदर्भ -** मा.संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे क्रमांक कशिमं/२०२६/पाच/८८ दिनांक २३/०१/२०२६ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात नमूद केल्यानुसार शासकीय रेखाकला परीक्षा २०२५ चा निकाल दि.०९/०१/२०२६ रोजी जाहीर करण्यात आला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना निकालाच्या दिवशीच Computer System Generated प्रमाणपत्र उपलब्ध होणार असून प्रमाणपत्रांची छपाई स्वतंत्रपणे करून केंद्रप्रमुख यांना वितरीत करण्याकरिता काही कालावधी लागणार आहे.

शासकीय रेखाकला परीक्षा २०२४ ची प्रमाणपत्रे छपाई करून या वर्षीच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांसोबत केंद्रप्रमुख यांच्यामार्फत वितरीत करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी शासकीय रेखाकला परीक्षा २०१९ नंतर फक्त २०२४ मधील परीक्षांची प्रमाणपत्रे छपाई करून वितरीत करण्यात आलेली आहेत. त्यामुळे सवलतीच्या गुणांकरिता २०२४ च्या प्रमाणपत्रासह तत्पुर्वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विचारात घेताना Computer System Generated प्रमाणपत्रही विचारात घेण्यात यावेत.

सबब, संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने विभागीय मंडळ स्तरावर उचित कार्यवाही करावी.

(मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने)

Mali
(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

सोबत- संदर्भिय पत्र

**प्रत माहिती साठी**
मा.संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी** –
मा.व्यवस्थापक, मणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.

G:\EXAM-7-2026.docx-35

महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक कशिमं/२०२६/पाच/ ४४ दिनांक :- 23 JAN 2026

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
राज्य मंडळ,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
स.नं.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९
बालचित्रवाणी शेजारी, आधारकर रिसर्च इन्स्टिटयुटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००४.

विषय: शासकीय रेखाकला (इंटरमिजीएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा-२०२५ उत्तीर्ण विद्यार्थ्यांची Computer System Generated प्रमाणपत्र सवलतीच्या गुणांसाठी ग्राहय धरणेबाबत.

फेब्रुवारी - मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सर्व विभागीय सचिव यांना राज्य मंडळामार्फत पाठविण्यात आलेल्या पत्रानुसार विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाहीसाठी माध्यमिक शाळांनी संबंधीत विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्याकरिता वाढीव मुदतीसह सुधारीत अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०२६ कळविला आहे.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या दि.०८/०१/२०२६ रोजीच्या पत्रानुसार (क्र.कशिमं/२०२५-२६/पाच/३४) शासकीय रेखाकला परीक्षा २०२५ चा निकाल दि.०९/०१/२०२६ रोजी जाहीर करण्यात आला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना निकालाच्या दिवशीच Computer System Generated प्रमाणपत्र उपलब्ध होणार असून प्रमाणपत्रांची छपाई स्वतंत्रपणे करुन केंद्रप्रमुख यांना वितरीत करण्याकरिता काही कालावधी लागणार आहे.

शासकीय रेखाकला परीक्षा २०२४ ची प्रमाणपत्रे छपाई करुन या वर्षीच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांसोबत केंद्रप्रमुख यांच्यामार्फत वितरीत करण्यात आलेले आहेत.

Scanned with CamScanner

प्रस्तुत प्रकरणी कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षा २०१९ नंतर फक्त २०२४ मधील परीक्षांची प्रमाणपत्रे छपाई करुन वितरीत करण्यात आलेली आहेत. त्यामुळे सवलतीच्या गुणांकरिता २०२४ च्या प्रमाणपत्रासह तत्पुर्वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विचारात घेताना Computer System Generated प्रमाणपत्रही विचारात घेण्याबाबत सर्व विभागीय मंडळाला आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई

प्रत : माहितीस्तव सादर,
१. मा.कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई
२. निवड नस्ती

Scanned with CamScanner